

Book-Post

To, ..........................................................

..........................................................

..........................................................

मातोश्री परळी 9822418564

प्रेषक

**प्राचार्या**

कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय

परळी वैजनाथ, जि.बीड – ४३१५१५

।। विदुषी राष्ट्रोत्कर्षं करोति ।।

कै.लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक मंडळ, परळी वैजनाथ संचलित

# कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय

परळी वैजनाथ

(कनिष्ठ व वरिष्ठ)

(कला, वाणिज्य व विज्ञान)

(नॅक मूल्यांकित 'बी' दर्जा प्राप्त)

Web :- www.lldmmparli.in

स्थापना : १९९७

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न

## २०२५- २०२६

(किंमत १०० रूपये फक्त)

# माहिती पुस्तिका



# मा.अध्यक्षांचे मनोगत

आनंदाचे डोही आनंदतरंग । आनंदचि अंग आनंदाचे

विद्यार्थिनी भगिनींनो ... नुतन शैक्षणिक वर्षात आनंददायी शिक्षण प्रवेशासाठी आपले मन:पूर्वक स्वागत ...

सध्याचे युग हे आव्हानाचे युग आहे.म्हणून आव्हानाला न घाबरता आनंदाने शिक्षण प्रक्रिया पूर्ण केली तर निश्चितच यशाची चव चाखता येते ; आणि विद्यार्थिनींना ही यशाची फळं चाखता यावीत यासाठी आमचे महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील असते.आमच्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व.श्यामरावजी देशमुख यांचे स्वप्नच प्रत्यक्षात साकार करण्याचा प्रयत्न आम्ही सातत्याने करत असतो. आनंददायी शिक्षण देता देता विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्वाचा बहुआयामी सर्वांगीन विकास हे आमच्या संस्थापक अध्यक्षांचे स्वप्न मूर्त रूपाला आणण्यासाठी आमचा महाविद्यालयातील प्रत्येक घटक प्रयत्नशील असतो.त्या स्वप्नाला साकार करणे हाच ध्यास आणि त्यासाठी हा श्वास ही भूमिका या प्रत्येक घटकाची आहे. आयुष्य हे आव्हानाने भरलेले आहे.ही आव्हाने पेलवण्याचे सामर्थ्य फक्त आणि फक्त दर्जेदार शिक्षणातच आहे .म्हणून आव्हानाने भरलेल्या या विश्वात समर्थपणे पुढे जाण्यासाठी उत्तम दर्जाचे शिक्षण देण्याचा हे महाविद्यालय सातत्याने प्रयत्न करते. विद्यार्थिनींमध्ये व्यवहार्यता, कुशलता येण्यासाठीची कौशल्य देता देता त्यांच्यासमोर मूल्यविचारांची पेरणीही येथे केली जाते. अगदी संस्थेचे ब्रीदवाक्य 'विदुषी राष्ट्रोत्कर्ष करोति' असे आहे. अर्थातच आम्हाला विद्वतापूर्ण स्त्री हवी आहे; पण ती राष्ट्राच्या व समाजाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारी असेल . . . ! मला याचा विशेष आनंद आहे की , संस्थेच्या स्थापनेपासूनच 'ब्रीदवाक्याला' समोर ठेऊन हा २८ वर्षाचा यशस्वी प्रवास आम्ही पूर्ण केलेला आहे. या यशस्वी प्रवासामध्ये आपण दिलेली महत्त्वपूर्ण साथ ही सुद्धा तितकीच महत्त्वाची ठरते.

दर्जेदार शिक्षण देण्याबरोबरच विद्यार्थिनींना स्वावलंबी बनवण्याकडे महाविद्यालयाचा विशेष कल असतो. प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून नामांकित कंपन्यांना बोलावून गेल्या दोन वर्षात आम्ही 'कॅम्पस इंटरव्युह' घेतले आहेत. त्यातून जवळपास ११५ विद्यार्थिनींना पदवी शिक्षण घेतानाच नोकरी उपलब्ध करून देण्यात आम्हाला यश आले आहे. ड्रेस डिझायनिंग ,संगणक प्रशिक्षण , स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन , वक्तृत्त्व कला तंत्र व स्वरूप आदीसारख्या कोर्सचे आयोजन करून त्या क्षेत्रात 'करिअर' करण्यासाठीचे मार्गदर्शन 'करिअर कट्टा' अंतर्गत या महाविद्यालयात सातत्यपूर्ण केले जाते.

२०२५ - २६ पासून नवीन शैक्षणिक धोरण लागू झाले आहे त्याची अंमलबजावणी आमचे महाविद्यालय कठोरपणे करण्याचा प्रयत्न करत आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार पारंपरिक व व्यावसायिक शिक्षण याचा सुंदर समन्वय आम्ही साधणार आहोत.अध्यात्म ,कला ,ज्ञान - विज्ञान ,तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रात आमची विद्यार्थिनी यशाची शिखरे गाठेल ...हा विश्वास !पण हे यशाचे शिखर गाठत असताना 'शीलम परम भूषणम्' याचेही संस्कार येथे केले जातील. आजपर्यंतच्या प्रवासात यादृष्टीने आमचे महाविद्यालय हे 'संस्कारपीठच'ठरलेले आहे. विद्यार्थिनीला केंद्रबिंदू ठेवून आम्ही केलेली नेत्रदीपक प्रगती यामुळे परळी पंचक्रोशीतील एक यशस्वी महाविद्यालय म्हणून या महाविद्यालयाकडे पाहिले जात आहे.

आम्ही आज जे यश संपादन केले. ते यश आपल्या सहकार्यामुळेच साध्य झाले आहे. म्हणून यापुढील प्रवासात पालकांची आम्हाला पुन्हा खंबीर साथ मिळेल हा विश्वास ...

धन्यवाद...!

**मा.संजय देशमुख**

अध्यक्ष,कै.ल.दे.शि.प्र.मंडळ,परळी वै.

## महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी विद्यापीठीय परीक्षेत केलेली नेत्रदीपक कामगिरी...

कु.अपर्णा नरवाडकर
'मराठी' विषयात विद्यापीठात सर्वप्रथम

कु.मूर्ती श्रावणी कृष्णा
विज्ञान शाखा विद्यापीठात सर्वप्रथम

कु.मूर्ती किरणमई कृष्णा
'गणित' विषयात विद्यापीठात सर्वप्रथम

कु.मुन्नी वैजनाथ मुंडे
'संस्कृत' विषयात विद्यापीठात सर्वप्रथम

कु.बडे अश्विनी संतोष
'गृहविज्ञान' विषयात विद्यापीठात सर्वप्रथम

कु.काळे दीपाली सुभाष
'संस्कृत' विषयात विद्यापीठात सर्वप्रथम

कु.मुंडे मीरा भगीरथ
'मराठी' विषयात विद्यापीठात सर्वप्रथम

कु.कोमल रामभाऊ सोनवणे
'मराठी' विषयात विद्यापीठात सर्वप्रथम

कु.कुरूडे अमृता अनिल
'संस्कृत' विषयात विद्यापीठात सर्वप्रथम

कु.आरती उदय औटी
'मराठी' विषयात विद्यापीठात सर्वप्रथम

## २०२४ - २०२५ मधील विविध कार्यक्रमातील काही क्षणचित्रे



सांस्कृतिक कार्यक्रमात मृदंगवादन करताना विद्यार्थिनी समूहासोबत प्रा.प्रसाद देशमुख सर



विविध कलागुण आविष्कार अंतर्गत स्वागतगीत सादर करतांना महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी



विद्यार्थिनी संसद सदस्यासोबत उपस्थित मान्यवर



कोळीगीत सादर करताना विद्यार्थिनी



देशभक्तिपर गीत सादर करताना विद्यार्थिनी



प्रार्थनासमयी उपस्थित विद्यार्थिनी

कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ.

स्त्री शिक्षणासाठी म.ज्योतीबा फुले यांच्या
विचारांचा वारसा ज्यांनी चालविला असे
संस्थेचे संस्थापक अध्यक्ष



## कै. श्यामरावजी देशमुख

मृत्यू :- ०६/११/२००५

कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ.



## कै.लक्ष्मीबाई संतुकराव देशमुख

मृत्यू : १/५/१९६०

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारूतः।।

Weapons cannot cleave him (soul)] nor fire burn him;
water cannot wet him, nor wind dry him away.

**BHAGAVAD-GITA**

## कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ.

### संस्थापक व ज्येष्ठ मार्गदर्शक



मा.श्री.अनिल श्यामराव देशमुख



मा.श्री.संजय श्यामराव देशमुख
अध्यक्ष
कै.ल.दे.शि.प्र.मंडळ,परळी वै.



मा.श्री.रवींद्र श्यामराव देशमुख
सचिव
कै.ल.दे.शि.प्र.मंडळ,परळी वै.



मा.प्रा.प्रसाद अनिलराव देशमुख
कोषाध्यक्ष
कै.ल.दे.शि.प्र.मंडळ,परळी वै.

## कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ.

# संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री.संजय श्यामराव देशमुख | अध्यक्ष |
| २. | मा.श्री.रमाकांतराव वामनराव जहागिरदार | उपाध्यक्ष |
| ३. | मा.श्री.रवींद्र मनोहर देशमुख | उपाध्यक्ष |
| ४. | मा.श्री.रवींद्र श्यामराव देशमुख | सचिव |
| ५. | मा.श्री.भालचंद्र बापुराव देशमुख | सहसचिव |
| ६. | मा.श्री.किशोर यशवंतराव जिंतुरकर | सहसचिव |
| ७. | मा.प्रा.प्रसाद अनिलराव देशमुख | कोषाध्यक्ष |
| ८. | मा.श्री.मनोहर विरप्पा कांबळे | सदस्य |
| ९. | मा.श्री.ॲड.गिरीष वैजनाथअप्पा चौधरी | सदस्य |
| १०. | मा.डॉ.मीनल लक्ष्मीनारायण लोहिया | सदस्य |
| ११. | मा.श्री.हेमंत विठ्ठलराव कुलकर्णी | सदस्य |
| १२. | मा.सौ.प्रभावती शामकांत जहागिरदार | सदस्य |
| १३. | मा.सौ.विद्याताई अनिलराव देशमुख | सदस्य |
| १४. | मा.सौ.छायाताई संजयराव देशमुख | सदस्य |
| १५. | मा.डॉ.सौ.विद्या व्यंकटराव देशपांडे | सदस्य |
| १६. | मा.सौ.स्नेहा सुरेशराव कवठाळकर | सदस्य |
| १७. | मा.श्री.मधुकर दिगांबरराव इटोलीकर | सदस्य |
| १८. | मा.श्री.मंगेश संजय देशमुख | सदस्य |
| १९. | मा.जान्हवी रवींद्र देशमुख | सदस्य |




**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर** मार्गदर्शन करताना सन्माननीय कुलगुरु डॉ.प्रमोद येवले व व्यासपीठावर उपस्थित इतर मान्यवर ...




**नॅक समिती महाविद्यालय मूल्यांकनाचा अहवाल संस्थाध्यक्ष संजयजी देशमुख यांच्याकडे सादर करताना सोबत सचिव रवींद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.प्रसादजी देशमुख, प्राचार्या तथा संचालिका डॉ.विद्या देशपांडे आदी.**

# कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ.



**प्राचार्या,डॉ.विद्या व्यंकटराव देशपांडे**

**(M.Sc., Ph.D.)**

**प्राचार्यांचे मनोगत**

शै.वर्ष २०२५ - २६ मध्ये महाविद्यालयात प्रवेश घेत असलेल्या विद्यार्थिनींचे मी मनःपूर्वक हार्दिक स्वागत करते.

आमचे महाविद्यालय विद्यार्थिनींना ज्ञानाचे धडे देता देता संस्काराचेही धडे देत असते. महाविद्यालयात विविध प्रकारच्या उपक्रमांतून आम्ही जीवनमूल्य सातत्याने रुजवण्याचा प्रयत्न करत असतो.यापुढेही हा संस्काराचा वसा आम्ही सातत्यपूर्ण चालू ठेवू असा विश्वास देते.

'नवीन शैक्षणिक धोरण' २०२४ - २५ पासून सुरु झालेले आहे. यावर्षी द्वितीय वर्षाकरिता हे धोरण लागू होत आहे. आम्ही या धोरणास सामोरे जाण्यास तत्पर आहोत. यापुढे राज्य शासन व विद्यापीठ जे वेळोवेळी निर्णय घेईल, त्यानुसार आम्ही 'नवीन शैक्षणिक धोरणा'ची अंमलबजावणी करणार आहोत.

गुणवत्तापूर्ण शिक्षण यासाठी आमचे महाविद्यालय सतत प्रयत्नशील असते. म्हणूनच आजपर्यंत आमच्यावर पालकांनी व विद्यार्थिनींनी विश्वास टाकलेला आहे. त्याबद्दल आपले मनःपूर्वक आभार ...!

धन्यवाद ...!



## महाविद्यालय विकास समिती

| | |
|---|---|
| १. मा.श्री.संजय श्यामराव देशमुख | अध्यक्ष (संस्था) |
| २. मा.श्री.रवींद्र श्यामराव देशमुख | संस्था पदाधिकारी |
| ३. मा.प्रा.प्रसाद अनिलराव देशमुख | शिक्षक प्रतिनिधी |
| ४. मा.श्रीमती प्रज्ञाताई गोपीनाथरावजी मुंडे | उद्योग क्षेत्र |
| ५. मा.डॉ.शामकांत वामनराव जहागीरदार | संशोधन क्षेत्र |
| ६. मा.श्री.पद्माकर नारायणराव देशपांडे | शिक्षण क्षेत्र |
| ७. मा.डॉ.विद्या व्यंकटराव देशपांडे | सचिव |
| ८. मा.डॉ.लक्ष्मण शिवराम मुंडे | विभागप्रमुख |
| ९. मा.डॉ.विवेकानंद बाबुराव कवडे | शिक्षक प्रतिनिधी |
| १०. मा.डॉ.शिवनारायण सुभाषराव वाघमारे | संयोजक, अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष |
| ११. मा.डॉ.कमल प्रभू खेडकर | शिक्षक महिला प्रतिनिधी |
| १२. मा.श्री.सुहास वैजनाथराव कण्व | शिक्षकेतर प्रतिनिधी |
| १३. मा.श्रीमती कल्याणी अनिलराव देशमुख | माजी विद्यार्थी |
| १४. मा.अध्यक्ष,महाविद्यालयीन विद्यार्थी समिती | सदस्य |
| १५. मा.सचिव,महाविद्यालयीन विद्यार्थी समिती | सदस्य |



नॅक समिती अध्यक्ष व सदस्यासोबत सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन करताना
संस्थेचे अध्यक्ष श्री संजयजी देशमुख व संस्थेच्या संचालिका तथा प्राचार्या, डॉ.विद्या देशपांडे

कैं.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ.



स्व.श्यामरावजी देशमुख स्मृतिसमारोहातील उद्घाटनप्रसंगी न्यायाधीश मा.आनंद मुंडे साहेब, नायब तहसीलदार परवीन पठाण यांच्यासमवेत संस्थाध्यक्ष संजयजी देशमुख, सचिव रवींद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.प्रसादजी देशमुख, प्राचार्या तथा संचालिका डॉ.विद्या देशपांडे.



महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ट महाविद्यालय व उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी हे पुरस्कार मा.उदयजी सामंत साहेब (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या शुभहस्ते स्वीकारताना तत्कालीन कार्यक्रमाधिकारी व डॉ. मुंडे एल.एस.

# कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ.



महाविद्यालयीन कर्मचारी वृंद



स्व.श्यामरावजी देशमुख स्मृतिसमारोहात उपस्थित सुप्रसिध्द व्याख्याते तथा पटकथाकार मा.अरविंद जगताप यांच्यासमवेत संस्थाध्यक्ष संजयजी देशमुख, सचिव रवींद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.प्रसादजी देशमुख, प्राचार्या तथा संचालिका डॉ.विद्या देशपांडे.



## ✻ संस्था राबवत असलेले उपक्रम ✻

**१) कै.लक्ष्मीबाई देशमुख वरिष्ठ महिला महाविद्यालय, परळी वै.**

**२) कै.लक्ष्मीबाई देशमुख कनिष्ठ महिला महाविद्यालय, परळी वै.**

**३) रमाई प्राथमिक विद्यालय, परळी वै. (इंग्रजी माध्यम)**

## ✻ महाविद्यालय राबवत असलेले उपक्रम ✻

१) विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून सांस्कृतिक विभागाची स्थापना.

२) वर्षभरामध्ये विविध ज्वलंत विषयांवर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

३) विविध राष्ट्रीय नेत्यांच्या जयंती व पुण्यतिथी साजऱ्या करून व्याख्याने आयोजित करण्यात येतात.

४) विद्यार्थिनींचा वाङ्.मयीन विकास व्हावा यासाठी (चैतन्य, फुलोरा, अर्थशोध,राज्य, अपूर्व) ही भीत्तिपत्रके प्रकाशित करण्यात येतात व मातुःश्री हा वार्षिक अंक प्रकाशित केला जातो.

५) विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

६) विद्यार्थिनींच्या नेतृत्व गुणात वाढ व्हावी म्हणून विद्यार्थिनींची संसद स्थापन करुन प्रतिनिधींची निवड करण्यात येते.

७) विद्यार्थी दशेतच मुलींचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा यासाठी अंधश्रध्दा निर्मूलन केंद्र सुरू करण्यात आले व त्यानिमित्त वर्षभरात कार्यशाळा घेण्यात येतात.

८) पदवी पूर्ण होताच प्रत्येक विद्यार्थिनी स्वतःच्या पायावर उभी रहावी म्हणून स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.

९) विद्यार्थिनींच्या सुप्तगुणांना चालना मिळावी यासाठी दरवर्षी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात येते. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थिनी दरवर्षी होणाऱ्या विद्यापीठाच्या युवक महोत्सवामध्ये आपला सहभाग नोंदवीत आहेत.

१०) १९९८-९९ पासून एन.एस.एस.युनिट सुरू करण्यात आलेले आहे.

११) कनिष्ठ विभागात २००८ पासून एन.एस.एस.युनिट कार्यरत आहे.

१२) कनिष्ठ महाविद्यालयाच्या १२ वी बोर्ड परीक्षेच्या तयारीसाठी 'लक्ष्मीबाई पॅटर्न' कार्यरत.

### ✻ उपलब्ध सुविधा ✻

१) महाराष्ट्र शासन व बोर्ड टेक्नीकल एज्यूकेशन यांचा ३ महिने मुदतीचा संगणक अभ्यासक्रम विद्यार्थिनीसाठी चालू करण्यात आला आहे.

२) सर्व सोयींनी युक्त शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी महाविद्यालयाची इमारत.

३) अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग.

४) सुसज्ज ग्रंथालय व अभ्यासिकेची उत्तम सोय.

५) गृहविज्ञान व विज्ञान शाखेच्या परिपूर्ण प्रयोगशाळा.

६) बाहेरील विद्यार्थिनींसाठी वसतिगृह (प्रस्तावित)

७) इतर विद्यार्थिनींसाठी माफक शुल्कामध्ये संगणक प्रशिक्षणाची सोय.

## * महाविद्यालयात प्रवेश कसा मिळवावा *

महाविद्यालयात प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींने परीक्षेचा निकाल लागल्यानंतर २० दिवसाच्या आत प्रवेश पत्रिकेद्वारे प्राचार्याकडे अर्ज करावा. त्यांना प्रवेश पत्रिका आणि माहिती पुस्तिका महाविद्यालयाच्या कार्यालयातून रविवार व सुट्टीच्या दिवसा व्यतिरिक्त अन्य दिवशी कार्यालयीन वेळेत रू.१००/-भरून मिळवता येईल. प्रथम सर्व प्रवेश हंगामी स्वरूपाचे असतील. प्रवेशाबाबत काही उणिवा आढळून आल्यास असे प्रवेश रद्द केले जातील. कुठल्याही विद्यार्थिनींचा महाविद्यालयातील प्रवेश रद्द करण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे. त्यासाठी कारणे दाखविण्याची आवश्यकता राहणार नाही तसेच विद्यार्थिनींच्या महाविद्यालयातील प्रवेश अर्जावर प्राचार्यांची स्वाक्षरी झाल्याशिवाय प्रवेश अंतिम समजण्यात येणार नाही.

## * प्रवेश पत्रिकेसोबत खालील कागदपत्रे जोडावीत *

१) शाळा/संस्था/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (टी.सी.)
(फक्त नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिंनीसाठी)

२) मागील परीक्षेचे गुणपत्रक ( Marks Memo)

३) मागासलेल्या जाती किंवा जमातीतील विद्यार्थिनींसाठी तहसील कार्यालयाने दिलेल्या प्रमाणपत्राची सत्यप्रत.

४) पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) (फक्त प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिंनीसाठी)

५) स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) (जर विद्यार्थिनी दुसऱ्या बोर्डाकडून अथवा विद्यापीठाकडून प्रवेश घेऊ इच्छित असेल तर)

६) ई.बी.सी.,स्कॉलरशिप चा आदेश क्रमांक.

वरील आवश्यक प्रमाणपत्राच्या मूळ प्रती व प्रत्येकी तीन सत्यप्रती द्याव्यात.

७) स्कॉलरशिप धारकांनी पासपोर्ट फोटो २ प्रती व ई.बी.सी.धारकांनी ३ प्रती जोडाव्यात.

८) आधार कार्डची सत्यप्रत.

९) इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन आहे.

## ✻ महत्त्वाचे नियम ✻

१) सकृतदर्शनी प्रवेश अर्जावर देण्यात येणारी प्रवेशाची अनुज्ञा पुढे जर त्यात काही दोष आढळून आले तर रद्द करण्यात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे प्रवेश मंजूर होतील.

२) प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणाने विद्यार्थिनींने महाविद्यालय सोडल्यास तिचे कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही मात्र ग्रंथालय व प्रयोगशाळा अनामत रक्कम परत केली जाईल.

३)द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीची टी.सी. व पात्रता प्रमाणपत्र क्रमांक (Eligilibility Certificate) संबंधित महाविद्यालयाकडून मागवून घेण्यात येईल. परंतु अंतिम जबाबदारी संबंधित विद्यार्थिनीची राहील.

## ✻ सर्वसाधारण नियम व सूचना ✻

१) शालांत परीक्षेचा निकाल घोषीत झाल्यानंतर ३ दिवसाच्या आत प्रवेशासाठी नोंदणी करावी.

२) गुणवत्ता यादीनुसार प्रवेश दिला जाईल.

३) मुलींना मोफत शिक्षणाचा फायदा मिळत असल्यामुळे त्यांनी प्रतिज्ञापत्र, कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र व गतवर्षीचा सवलत मिळाल्याचा आदेश क्रमांक सादर करावा.

४) अकरावी, बारावीच्या विद्यार्थिनींना सर्व परीक्षेला बसणे बंधनकारक आहे. अकरावीचा निकाल गुणांच्या आधारे घोषित केला जातो. एकाही विषयास गैरहजर राहिल्यास निकाल अनुत्तीर्ण म्हणून घोषित केला जाईल.

५) प्रवेश पूर्ण झाल्यानंतर शाखा व विषय बदलता येणार नाही.

## ✻ कनिष्ठ विभाग ✻

१) कनिष्ठ महाविद्यालयास कला व विज्ञान शाखेत खालील विषय ठेवलेले आहेत

**कला शाखा : आवश्यक विषय :-**

**१) इंग्रजी        २) पर्यावरण**

**३) द्वितीय भाषा : हिंदी**

**ऐच्छिक:-** खालीलपैकी कोणतेही चार विषय निवडता येतील.

✻ **इ.११ व १२ वी कला शाखेसाठी** खालील एका गटाचे विषय निवडता येतील.

**गट - १) समाजशास्त्र,राज्यशास्त्र,अर्थशास्त्र,गृहव्यवस्थापन**

**गट - २) समाजशास्त्र,राज्यशास्त्र,संगीत १, संगीत २**

✻ **११ वी विज्ञान शाखा :-** १.इंग्रजी, २.संस्कृत, ३.पर्यावरणशास्त्र

**१) भौतिकशास्त्र २) रसायनशास्त्र   ३) जीवशास्त्र   ४) गणित**

## ✻ वरिष्ठ विभाग ✻

**Major :- कला शाखा (प्रथम वर्ष)**

**Group 1st**-मराठी,हिंदी,इंग्रजी,संस्कृत **Group 2nd** - राज्यशास्त्र

**Group 3rd** - समाजशास्त्र/संगीत **Group 4th** - इतिहास/गृहविज्ञान/भूगोल

**Group 5th** - अर्थशास्त्र **Group 6th** - लोकप्रशासन

(वरीलपैकी कोणत्याही तीन गटातून एक एक विषय निवडून DSC-1, DSC-2, DSC-3 हा मेजर विषयाचा भाग पूर्ण करावा. द्वितीय सत्रासाठीसुध्दा हीच पध्दत वापरुन DSC-4, DSC-5, DSC-6 पूर्ण करावा.)

**Major :- विज्ञान शाखा (प्रथम वर्ष)**

**Group 1st** - Chemistry **Group 2nd** -Physics

**Group 3rd** - Botany/Mathematics **Group 4th** - Zoology

**Group 5th** - Computer Science

(वरीलपैकी कोणत्याही तीन गटातून एक एक विषय निवडून DSC-1, DSC-2, DSC-3 हा मेजर विषयाचा भाग पूर्ण करावा. द्वितीय सत्रासाठीसुध्दा हीच पध्दत वापरुन DSC-4, DSC-5, DSC-6 पूर्ण करावा.)

**Major :- वाणिज्य शाखा (प्रथम वर्ष)**

**प्रथम सत्र –** DSC -1 Financial Accounting-I, DSC -2 Principles of Managment -I, DSC-3 Entrepreneurship Development-I

**द्वितीय सत्र –** DSC -4 Financial Accounting-II, DSC -5 Principles of Managment -II, DSC-6 Entrepreneurship Development-II

1. **Major :-** प्रथम सत्र DSC-1, DSC-2, DSC-3; द्वितीय सत्र DSC-4, DSC-5, DSC-6
2. **Generic/OE :-** मेजर विषय घेतलेली शाखा सोडून दुसऱ्या शाखेचा विषय निवडावा लागेल. तो निवडताना विद्यापीठाने ठरवून दिलेल्या बास्केटचा विचार करावा.
3. **SEC :-** प्रथम सत्राकरिता विद्यार्थ्यांनी आपल्या अभिरुचीनुसार विषय निवडावा.(बास्केटप्रमाणे)
4. **VSC :-** द्वितीय सत्राकरिता विद्यार्थ्यांनी आपल्या अभिरुचीनुसार मेजर विषयाच्या संबंधित विषय निवडावा. (बास्केटप्रमाणे)
5. **AEC :-** प्रथम वर्षातील प्रथम सत्रासाठी **इंग्रजी** अनिवार्य व द्वितीय सत्रासाठी **मॉडर्न इंडियन लँग्वेज** पैकी एखादा विषय निवडावा लागेल.
6. **VEC :-** द्वितीय सत्रासाठी **भारतीय संविधान** हा विषय अनिवार्य असेल.
7. **IKS :-** विद्यापीठाने ठरवून दिलेला भाग. (बास्केटप्रमाणे)
8. **CC1 :-** प्रथम सत्रासाठी **हेल्थ अँड वेलनेस** हा विषय असेल.
9. **CC2 :-** द्वितीय सत्रासाठी **योगा/स्पोर्टस अँड फिटनेस**.

(२०२४-२०२५ पासून नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्यात आले आहे. त्यामुळे पदवी प्रथम व द्वितीय वर्षास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे बंधनकारक असतील.)

# * वरिष्ठ विभाग *

**Major :- (पदवी द्वितीय वर्ष)**

**1. Major :-** प्रथम वर्षासाठी निवडलेल्या तीन मेजर विषयातून एका मेजर विषयाची निवड करावी.

तृतीय सत्र DSC-7, DSC-8 चतुर्थ सत्र DSC-9, DSC-10

**2. Minor :-** प्रथम वर्षासाठी निवडलेल्या तीन मेजर विषयातून एका मायनर विषयाची निवड करावी. (द्वितीय वर्षासाठी निवडलेला मेजर विषय वगळून)

तृतीय सत्र Mn-1, Mn-2 चतुर्थ सत्र Mn-3, Mn-4

**3. Generic/OE :** प्रथम वर्षासाठी निवडलेला जनरिक विषय पुढे कायम ठेवावा.

**4. VSC :-** तृतीय सत्राकरिता प्रथम वर्षासाठी निवडलेला VSC विषय पुढे कायम ठेवावा.

**4. SEC :-** चतुर्थ सत्राकरिता प्रथम वर्षासाठी निवडलेला SEC विषय पुढे कायम ठेवावा.

**5. AEC :-** द्वितीय वर्षातील तृतीय सत्रासाठी **इंग्रजी** अनिवार्य व चतुर्थ सत्रासाठी **मॉडर्न इंडियन लँग्वेज** पैकी एखादा विषय जो प्रथम वर्षाला निवडलेला आहे तो कायम ठेवावा.

**6. VEC :-** तृतीय सत्रासाठी **पर्यावरण अभ्यास** हा विषय अनिवार्य असेल.

**7. FP1 (Field Project) :-** विद्यापीठाने ठरवून दिलेला भाग.

**8. CC3 :-** तृतीय सत्रासाठी **(Co-Curricular courses)** हा विषय असेल.

**9. CC4 :-** चतुर्थ सत्रासाठी **(Co-Curricular courses)** हा विषय असेल.

## वाणिज्य शाखा (मेजर)

**तृतीय सत्र –** DSC-7 Corporate Accounting-I, DSC-8 Cost Accounting -I, DSC-9 Marketing Managment-I

**चतुर्थ सत्र –** DSC-10 Corporate Accounting-II, DSC-11 Cost Accounting -II, DSC-12 Marketing Managment-II

**सूचनाः** १) नवीन शैक्षणिक धोरणानुसार सत्र पध्दती (Semister Exam.) सुरू करण्यात आलेली आहे.

२) वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी विद्यार्थिनीकडे ABC सह Diglocker असणे बंधनकारक राहील.

## पदवी तृतीय वर्ष - CBCGS

## कला शाखा

तीन ऐच्छिक विषयासाठी

**1. DSC -** **2. SEC -**

**याप्रमाणे दोन अभ्यासपत्रिका निवडाव्यात.**

**3. Generic : कला शाखेतीलच एक विषय निवडावा. (ऐच्छिक विषय वगळून)**

## विज्ञान शाखा

तीन ऐच्छिक विषयासाठी

**1. DSC - दोन पेपर थेअरी व २ पेपर प्रॅक्टीकल**

**याप्रमाणे तीन अभ्यासपत्रिका निवडाव्यात.**

**2. SEC : वरील जे तीन विषय निवडलेले आहेत त्यापैकी एका विषयाचे SEC निवडावे. (१ पेपर)**

## वाणिज्य शाखा

**B.Com Third Year**

I Advanced Financial Accounting-I
II Management Accounting-I
III Auditing
IV Buisness Regulatory framework
V Computerised Accounting - I

**VI OPTIONAL**

Rural Development & Agricultural Marketing - I

### ✻ शिष्यवृत्ती व फी माफी ✻

शिष्यवृत्ती व फी माफीसाठी विद्यार्थिनींनी खालील अटी पूर्ण केल्या पाहिजेत.

१)एकापेक्षा जास्त सवलतीचा फायदा विद्यार्थिनींना घेता येणार नाही. जास्तीत जास्त फायदा असणारी सवलत विद्यार्थिनीस दिली जाईल. २) नियमित उपस्थिती आवश्यक आहे.

३) महाविद्यालयाच्या सर्व परीक्षात विद्यार्थिनी उत्तीर्ण झालेली असली पाहिजे.

४) अभ्यासातील प्रगती व विद्यार्थिनी वर्तणूक समाधानकारक असली पाहिजे.

**ई.बी.सी.**

अ) शासन निर्णयानुसार ज्या विद्यार्थीनिंच्या आई-वडिलांचे/पालकांचे मागील वर्षीचे उत्पन्न रू.८,००,००० आहे. त्याच विद्यार्थिनी या सवलतीस पात्र राहतील. तसे मा.तहसीलदार यांचे उत्पन्नांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

ब) ही सवलत मिळणाऱ्या विद्यार्थिनींना अध्ययन शुल्क, प्रयोगशाळा शुल्क भरावे लागणार नाही.

क) ई.बी.सी.फॉर्म ऑनलाईन पद्धतीने भरून हार्ड कॉपी २ प्रतीत महाविद्यालयात जमा करावी.

ड) अर्जासोबत ठराविक नमुन्यात नोंद केलेल्या उत्पन्नाच्या प्रतिज्ञापत्राच्या दोन प्रती, आधार कार्ड, पॅनकार्ड, स्वतःचे बँकेत खाते असलेले पासबुक झेरॉक्स, कायमस्वरूपी मोबाईल नंबर जोडणे आवश्यक आहे.

इ) नापास झालेल्या विद्यार्थिनींना सवलतीचा लाभ मिळणार नाही.

ई) एखाद्या विद्यार्थिनीने प्रत्येक विषयामध्ये नियमाप्रमाणे ७५ टक्के हजेरी पूर्ण केली नसल्यास तिला वरील फी माफी मिळणार नाही. तसेच विद्यार्थिनी जर परीक्षेस बसली नाही तर तिची सवलत रद्द केली जाईल व तिच्याकडून पूर्ण शुल्क वसूल केले जाईल.

उ) ज्या विद्यार्थिनींना मागील वर्षी ही सवलत मिळत होती त्यांना नुतनीकरणाचा अर्ज भरावा लागेल.

**भारत सरकारची (जी.ओ.आय.) शिष्यवृत्ती :-**

अनु.जाती/जमाती व भटक्या विमुक्त जातीच्या पात्र विद्यार्थिनींना भारत सरकारची (जी.ओ.आय.) शिष्यवृत्ती मिळते.

१) भारत सरकार शिष्यवृत्ती फॉर्म डिबीटी पोर्टलवर ऑनलाईन भरुन प्रिंट कार्यालयात द्यावी.

२) भारत सरकारची (जी.ओ.आय.) शिष्यवृत्ती धारक विद्यार्थिनींसाठी आधार कार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक झेरॉक्स,कायमस्वरूपी मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.

३) पात्र विद्यार्थिनीनी शिष्यवृत्ती अर्ज सुवाच्च अक्षरात भरून योग्य त्या कागदपत्राच्या प्रमाणित प्रतीसह दिलेल्या तारखेच्या आत कार्यालयात देण्याची दक्षता घ्यावी.

४) सूचना फलकावर लावण्यात येणाऱ्या सूचना वाचून त्रुटीची पूर्तता करावी.

५) कार्यालयात शिष्यवृत्ती मंजूरीबाबत विचारणा करावी.

६) भारत सरकारची (जी.ओ.आय.) शिष्यवृत्ती धारकांना डुप्लीकेट टी.सी.वर प्रवेश दिला जाणार नाही.

७) दुसऱ्या जिल्ह्यातून विद्यार्थिनी आली असेल तर जिल्हा बदली प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

८) मागील वर्षी ज्यांना ही शिष्यवृत्ती मिळत होती त्यांनी नुतणीकरणासाठी संपूर्ण तपशीलासहित अर्ज करावा.

९) नियमित ७५% उपस्थिती आवश्यक आहे.

७) शिष्यवृत्ती मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार संबंधित खात्याचा असून महाविद्यालयाचा त्याच्याशी काहीही संबंध नाही.

(नोट : टी.सी.व गुणपत्रकाच्या पुरेशा सत्यप्रती प्रवेशापुर्वीच काढून ठेवाव्यात. कारण कार्यालयातून मूळ कागदपत्रे सत्यप्रतीसाठी देता येत नाही हे लक्षात ठेवावे.)

८) शै.वर्ष २०२१-२०२२ पासून अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थिनींची संपूर्ण शिष्यवृत्ती व तसेच महाविद्यालयाचे शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क हे विद्यार्थिनींच्या बँक खात्यावर समाजकल्याणमार्फत जमा होत आहे. विद्यार्थिनींच्या बँक खात्यावर महाविद्यालयाची जमा होणारे शुल्क ०७ दिवसाचे आत महाविद्यालयास जमा (परत) करणे बंधनकारक राहील.

**फ्रीशीप :-**

१) पालकाचे मासिक उत्पन्न आठ लाखापर्यंत.

२) विद्यार्थिनी नापास झाली असल्यास. (पुनःर्प्रवेश)

३) दोन नंतरचे अपत्य असलेल्यांनी फ्रीशीपसाठी अर्ज करावा.

**प्राथमिक शिक्षकांच्या मुलींसाठी शैक्षणिक सवलत :-**

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती जाहीर केल्या आहेत. फी माफीची सवलत खालील अटीवर देण्यात येते.

१) अर्जदार विद्यार्थिनीचे आई/वडील पूर्ण वेळ प्राथमिक शिक्षक असावेत.

२) नियमित उपस्थिती असणे आवश्यक. ३) समाधानकारक प्रगती.

४) ठराविक नमुन्यातील अर्ज भरून पालकाच्या नोकरीच्या प्रमाणपत्रासह गट विकास अधिकाऱ्यांच्या सही शिक्क्यासह कार्यालयात दाखल करावेत. ५) आई जर प्राथमिक शिक्षिका असेल तर त्यांचे नवीन नाव गॅझेटमध्ये बदलून आले पाहिजे अन्यथा फी माफीची सवलत मिळत नाही. ६) ही सवलत मिळणाऱ्या विद्यार्थिनींना शुल्क दराच्या तक्त्यातील शुल्क क्रमांक २,३,५ सोडून इतर नियमाप्रमाणे सर्व शुल्क भरावे लागेल.

**प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलींना शिष्यवृत्ती :-**

* मान्यताप्राप्त प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना अप्रत्यक्ष सहाय्य देणे या उद्देशाने ही शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे. शालेय अभ्यासक्रमानंतरच्या सर्वसामान्य पूर्णवेळ अभ्यासासाठी बारावीमध्ये ६० % किंवा त्यापेक्षा जास्त गुण असणाऱ्या विद्यार्थिनी या शिष्यवृत्तीस पात्र ठरतात. ठराविक नमुन्याचा अर्ज प्राचार्यामार्फत शिक्षण संचालकाकडे ठराविक तारखेच्या आत करावा लागतो.

**स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलींना शैक्षणिक सवलती :-**

मागील काही वर्षापासून महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्य सैनिकांच्या अविवाहित मुलींनाच या सवलतीचा फायदा मिळू शकेल अशी तरतूद केली आहे. सविस्तर माहितीसाठी कार्यालयात संपर्क साधावा.

**शारीरिक अपंग शिष्यवृत्ती :-** शारीरिक अपंग असणाऱ्या विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती दिली जाते. संबंधित खात्याने दिलेल्या नियमाच्या आधीन राहून विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयात सादर करावा. महाविद्यालयाने मागवलेली माहिती व कागदपत्रांची पूर्तता विद्यार्थिनीने करावी. चुकीची माहिती पुरविल्यास संबंधित विद्यार्थिनी शिक्षेस अथवा दंडास पात्र राहील.

**शासकीय गुणवत्ता शिष्यवृत्ती :-** (Talent Development)

विद्यार्थिनींना १२ वी विज्ञान व कला या वर्गात गणित व भौतिकशास्त्र या विषयांना ६०% पेक्षा जास्त गुण असल्यास वरील शिष्यवृत्तीचा लाभ घेता येतो. अशा विद्यार्थिनींचा अर्ज प्राचार्याच्या सहीने संबंधित खात्यास पाठवला जातो.

**महाविद्यालयाच्या सवलती व बक्षिसे :-**

**-० सवलती ०-**

बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम. प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी खालील सवलत जाहीर करण्यात येत आहे.

१२ वीला ७५ % व अधिक गुण असणाऱ्या विद्यार्थिनीला शैक्षणिक शुल्कात ५०% सवलत देण्यात येईल. वरील सवलतीचा फायदा फक्त त्याच विद्यार्थिनीला मिळेल. ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १५,०००/- पर्यंत असेल व ज्यांना ई.बी.सी. व अन्य सवलती नसतील.

**-० बक्षिसे ०-**

१) १२ वी कला शाखेतून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीला कै.प्रकाश भगवानराव नव्हाडे यांचे स्मरणार्थ प्रत्येक वर्षी रू.१,००० रोख बक्षीस.

२) १२ वी विज्ञान शाखेतून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीला कै.रामराव हरिभाऊ पवार यांचे स्मरणार्थ प्रत्येक वर्षी रू.१,००० रोख बक्षीस.

३) बी.ए.तृतीय वर्षातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस कै.संतुकराव देशमुख यांच्यास्मरणार्थ ५०१/- रू. रोख.

४) बी.एस्सी.तृतीय वर्षातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस कै.लक्ष्मीबाई देशमुख यांच्या स्मरणार्थ ५०१/- रू. रोख.

५) बी.कॉम.तृतीय वर्षातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस सौ.प्रभावती शामकांत जहागिरदार यांच्यातर्फे ५०१/- रू. रोख.

६) बी.एस्सी.तृतीय वर्षातून गणित विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस डॉ.एम.बी.जोशी यांच्या तर्फे ५०१ रू.रोख बक्षीस.

७) बी.एस्सी.तृतीय वर्षात गणित विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस कै.श्यामरावजी देशमुख यांच्या स्मरणार्थ प्रा.डॉ.विद्याताई देशपांडे (देशमुख) यांच्यातर्फे ५०१ रू.चे रोख बक्षीस.

८) विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस नेमचंद कुरकुट यांच्यातर्फे ५०१ रुपयाचे रोख बक्षीस.

## –० महत्त्वाच्या सूचना व नियम ०–

१) प्रवेश अर्जावर विहित जागी विद्यार्थिनींने अलिकडच्या काळातील (नवीन) स्वतःचा पासपोर्ट फोटो जोडावा.

२) ज्या विद्यार्थिनीने माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक परीक्षा मंडळाऐवजी अन्य मंडळामार्फत दिलेली असल्यास अशा विद्यार्थिनीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ औरंगाबाद यांच्याकडून पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) प्राप्त करून प्रवेश समितीस सादर करावे.

३) निवडलेले विषय बदलता येत नाहीत त्यामुळे विद्यार्थिनींनी आपले विषय विचारपूर्वक निवडावेत.

४) एखाद्या विद्यार्थिनीस प्रवेश रद्द करावयाचा असल्यास तिने प्रवेश घेण्याच्या शेवटच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत प्राचार्याकडे लेखी अर्ज करून प्रवेश रद्द करून घ्यावा.

५) प्रवेशाच्या वेळी महाविद्यालयात दाखल केलेले / शाळा महाविद्यालय सोडण्याचे प्रमाणपत्र (टी.सी.) परत मिळणार नाही. त्याऐवजी महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (टी.सी.) मिळेल.

## –० शिस्त ०–

१) महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थिनींने स्वतः जवळ महाविद्यालयाचे ओळखपत्र ठेवणे आवश्यक आहे.

२) तासिका चालू असतांना वर्गासमोर व्हरांड्यातून विद्यार्थिनीने फिरू नये.

३) प्रत्येक विद्यार्थिनीची दैनंदिन उपस्थिती अनिवार्य असून तासिका चालू असतांना लेडीज रूम, कॅन्टीन किंवा कॉलेजच्या आवारात न बसता तासिकेस उपस्थित राहावे.

४)वर्ग चालू असतांना विद्यार्थिनींना बाहेरील व्यक्तीस भेटण्यास सक्त मनाई आहे.

५) महाविद्यालयाच्या बाकांवर,भिंतीवर तसेच फलकावर विद्यार्थिनीने कोणताही मजकूर लिहू नये.

६) गैरहजर राहण्यासंबंधी प्राध्यापकांची किंवा प्राचार्यांची पूर्वपरवानगी घेतली पाहिजे.

७) महाविद्यालयात वेळोवेळी होणाऱ्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमास विद्यार्थिनीने उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

८) महाविद्यालयात विद्यार्थीनींना भ्रमणध्वनी (मोबाईल) आणण्यास सक्त मनाई आहे.

## –० शिस्त पालनाच्या नियमाचा भंग केल्यास ०–

१) नियमभंगाच्या गुन्ह्याची नोंद केली जाईल.

२) पालकांशी संपर्क साधला जाईल. ३) दंड आकारला जाईल.

## –० प्रयोगशाळा ०–

१) गृहविज्ञान व विज्ञान शाखेतील विद्यार्थिनींनी आपले रेकॉर्डबुक वेळेत तयार करून संबंधित प्राध्यापकांकडून तपासून घ्यावेत.

२) प्रयोगशाळेत ओळखपत्र आवश्यक आहे.

३) प्रयोगशाळेतील वस्तु स्वच्छ व सुरक्षित ठेवणे ही विद्यार्थिनीची जबाबदारी राहील. विद्यार्थिनीकडून वस्तुंची तुटफूट झाल्यास अथवा हरवल्यास भरपाई करून घेण्यात येईल.

४) प्रयोग चालू असतांना सुती कपडे वापरणे, ॲप्रन आणि नॅपकिन जवळ असणे आवश्यक आहे.

५) प्रयोग शाळेतील रसायने शास्त्रीय पध्दतीने हाताळावीत, विद्यार्थिनीच्या निष्काळजीपणामुळे तिला इजा झाल्यास महाविद्यालय त्याला जबाबदार राहणार नाही.

## –० ग्रंथालय ०–

महाविद्यालयाचे ग्रंथालय, संगणक व इंटरनेट सुविधेसह उपलब्ध असून एखाद्या विषयाचा विशेष अभ्यास करण्यासाठी ग्रंथालयामध्ये पाठ्यपुस्तकांशिवाय प्रत्येक विषयाची भरपूर व चांगल्या दर्जाची पुस्तके उपलब्ध आहेत. पाठ्यपुस्तकांचा उपयोग गरीब व होतकरू विद्यार्थिनींना करता येईल.

१) ग्रंथालयात सुसज्ज असा वाचन कक्ष उपलब्ध आहे.

२) प्रत्येक विद्यार्थिनीस ओळखपत्र दिले जाईल. तिने ते महाविद्यालयात नेहमीजवळ बाळगले पाहिजे.

३) ग्रंथालयात व वाचनालयात पूर्ण शांतता पाळली पाहिजे.

४) तास चालू असताना उपस्थित न राहता वाचनालयात जाण्यास परवानगी मिळणार नाही.

५) ग्रंथालयातील नियमाप्रमाणे पुस्तकांची देवघेव केली जाईल व त्या नियमांचे विद्यार्थिनीने पालन केले पाहिजे.

६) ग्रंथालयातून पुस्तक ज्या दिवशी दिले तो दिवस धरून ७ दिवसांकरिता दिले जाईल.

७) घरी अभ्यासाकरिता म्हणून एका वेळी एकच पुस्तक मिळेल.

८) अपवादात्मक परिस्थितीत एखादे पुस्तक दिलेल्या मुदतीच्या अगोदर मागवले जाईल व ते विद्यार्थिनीस परत करावे लागेल.

९) संदर्भ ग्रंथ, वाचनालयात वाचण्यासाठी म्हणून दिलेली पाठ्यपुस्तके तसेच मासिक वगैरे घरी नेता येणार नाही. ती वाचनालयातच बसून वाचली पाहिजेत.

१०) पुस्तकाची पाने फाडणे, त्यात मजकूर लिहिणे, खराब करणे अशी बाब निदर्शनास आल्यास पुस्तकाच्या किंमतीच्या दिडपट इतकी रक्कम दंड म्हणून भरावी लागेल.

११) दुसरे सत्र संपण्यापूर्वीच विद्यार्थिनीने पुस्तक परत केले पाहिजे.

१२) दिलेल्या मुदतीनंतरच्या प्रत्येक दिवसात १ रूपया दंड पुस्तक परत करेपर्यंतच्या तारखेपर्यंत आकारला जाईल.

**-० ओळखपत्र ०-**

१) सर्व विद्यार्थिनींनी प्रवेश देण्याचे काम संपल्यावर महाविद्यालयाच्या कार्यालयातून ओळखपत्र दिले जाईल.

२) ओळखपत्रावर अलिकडे काढलेला स्वच्छ पासपोर्ट आकाराचा फोटो लावला पाहिजे.

३) ओळखपत्राची मुदत फक्त एक शैक्षणिक वर्षाइतकी राहील.

४) ओळखपत्र हरवल्यास दुसरे ओळखपत्र मिळविण्यासाठी रीतसर अर्ज करून रू. ५०/- भरल्यास ओळखपत्राची दुसरी प्रत मिळेल.

५) महाविद्यालय सोडतांना विद्यार्थिनीने ओळखपत्र परत करणे बंधनकारक आहे.

## एन.एस.एस.विभाग

**प्रा.डॉ.विवेकानंद कवडे**
(वरिष्ठ महाविद्यालय कार्यक्रमाधिकारी)

**प्रा.डॉ.कचरे एस. व्ही.**
(वरिष्ठ महाविद्यालय कार्यक्रमाधिकारी)

**प्रा.डॉ.रोडे एस.बी.**
(वरिष्ठ महाविद्यालय सहकार्यक्रमाधिकारी)

**प्रा.डॉ.गुळभिले व्ही. डी.**
(वरिष्ठ महाविद्यालय सहकार्यक्रमाधिकारी)

**प्रा.फुटके पी.एम.**
(कनिष्ठ महाविद्यालय कार्यक्रमाधिकारी)

**प्रा.डॉ.वीणा भांगे**
(कनिष्ठ महाविद्यालय सहकार्यक्रमाधिकारी)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## अभ्यास केंद्र

### पूर्वतयारी अभ्यासक्रम व बी.ए./बी.कॉम पदवी अभ्यासक्रम केंद्र.

ज्या व्यक्ती उच्च शिक्षणापासून वंचित आहेत कोणत्याही नोकरीमध्ये असतांना शिक्षण कमी असल्यामुळे बढती होऊ शकत नाही अशा होतकरू व्यक्तींसाठी मुक्त विद्यापीठाने बी.ए.व बी.कॉम अभ्यासक्रम विकसित केला आहे.

ज्या व्यक्ती दहावी, बारावी उत्तीर्ण नाहीत अशांसाठी पूर्वतयारी अभ्यासक्रमाची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांना बी.ए./बी.कॉम प्रथम वर्षाला प्रवेश दिला जातो.

संगणक अभ्यासक्रम व पूर्वतयारी अभ्यासक्रम, बी.ए./बी.कॉम. पदवी अभ्यासक्रम याविषयी अधिक माहिती मिळविण्याकरिता महाविद्यालयातील मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा.

### -० स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र ०-

महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कार्यरत असून या केंद्रांतर्गत विद्यार्थिनींना U.P.S.C,M.P.S.C. रेल्वे स्टॉफ सलेक्शन, B.Ed. पूर्व परीक्षा इतर परीक्षांचे मार्गदर्शन केले जाते. वर्षभर प्रत्येक रविवारी वर्ग चालविले जातात. या केंद्रातर्गत स्वतंत्र ग्रंथ संग्रह केला असून मागील वर्षी जवळपास १० हजार रूपयांची स्पर्धा परीक्षेची पुस्तके मासिके खरेदी केली आहेत.

---

# शैक्षणिक वर्ष :- २०२५-२०२६

## * कार्यक्रम दर्शिका *

### -० नोंदणी व प्रवेश ०-

११ वी कला व विज्ञान - १० वी च्या परीक्षा निकालानंतर १० दिवस.

कला,वाणिज्य व विज्ञान प्रथम वर्ष १२ वीच्या परीक्षा निकालानंतर १० दिवस.

नोंदणी केलेल्या विद्यार्थिनींना गुणानुक्रमे व आरक्षणपरत्वे प्रवेश दिला जाईल.

१२ वी कला वाणिज्य व विज्ञान द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींची प्रवेश प्रक्रिया निकालानंतर १५ दिवसापर्यंत चालू राहतील.

### -० नियमित वर्ग ०-

| | |
|---|---|
| ११ वी कला व विज्ञान | १५ जुलै २०२५ |
| १२ वी कला व विज्ञान | १३ जून २०२५ |
| कला, वाणिज्य, विज्ञान (प्रथम,द्वितीय,तृतीय वर्ष) | ०९ जुलै २०२५ |
| विद्यार्थिनी संसद व विविध मंडळाची स्थापना | - ऑगस्ट २ रा आठवडा |
| विद्यार्थिनी संसद उद्‌घाटन | - सप्टेंबर १ ला आठवडा |
| परीक्षा :-(११ वी, १२ वी व वरिष्ठ विभाग) | |
| १) प्रथम घटक चाचणी | - सप्टेंबर २ रा आठवडा |
| २) द्वितीय घटक चाचणी | - ऑक्टोबर २ रा आठवडा |
| ३) सत्र परीक्षा | - विद्यापीठ वेळापत्रकानुसार |
| दीपावली सुट्टी | - दि.१७/१०/२०२५ ते ०९/११/२०२५ (अंदाजित) |
| नियमित वर्ग :- | - नोव्हेंबर २०२५ - २ रा आठवडा |
| वार्षिक स्नेहसंमेलन :- | - जानेवारी.२०२६ |

## परीक्षा

१) तृतीय घटक चाचणी — जाने.२०२६ – १ ला आठवडा

२) चतुर्थ घटक चाचणी — फेब्रु.२०२६ – १ ला आठवडा

३) द्वितीय सत्र — विद्यापीठ वेळापत्रकानुसार

## निकाल

१) पूर्व वार्षिक परीक्षेचे निकाल
व निरोप समारंभ — फेब्रुवारी २ रा आठवडा

## प्रवेश क्षमता

११ वी व १२ वी–१२० प्रत्येकी

कला, वाणिज्य व विज्ञान प्रथम वर्ष १२० प्रत्येकी

---

**फेब्रुवारी २०२५ मध्ये इ.१२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे**




| १२ वी विज्ञान | | १२ वी कला | |
|---|---|---|---|
| १) रोडे पल्लवी आत्माराम | ८२.६७% | १) सातपुते संध्या वैजनाथ | ८०.७६% |
| २) सातपुते नंदिनी बालासाहेब | ८१.००% | २) सरवदे साक्षी लक्ष्मण | ७६.५०% |
| ३) कुरेशी रुखसार असेफ | ८०.१७% | ३) पुजारी गौरी अजय | ७६.१०% |

– अभिनंदनोत्सुक –

**कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,**

**परळी वैजनाथ,जि.बीड.**

# कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,

## परळी वैजनाथ,जि.बीड.

### -० प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद वरिष्ठ महाविद्यालय ०-

प्राचार्या

## डॉ.विद्या व्यंकटराव देशपांडे

(M.Sc., Ph.D.)

## कला शाखा

*** मराठी विभाग**

प्रा.डॉ.यल्लावाड आर.के.
M.A.B.Ed. SET, Ph.D. **(संशोधन मार्गदर्शक)**
प्रा.डॉ.नेरकर एस.एस.M.A.NET,Ph.D.

*** हिंदी विभाग**

प्रा.डॉ.मुंडे एल.एस.M.A.M.Phill
B.Ed.SET, Ph.D **(संशोधन मार्गदर्शक)**
प्रा.डॉ.कल्याणकर आर.बी.M.A.M.Phill,Ph.D.

*** इंग्रजी विभाग**

प्रा.डॉ.खेडकर के.पी.M.A. SET, Ph.D.
प्रा.डॉ.वाघमारे एस.एस.
M.A. SET,M.Phil.Ph.,D **(संशोधन मार्गदर्शक)**

*** राज्यशास्त्र विभाग**

प्रा.डॉ.शहाणे आर.पी.M.A. M.Phill, Ph.D.

*** समाजशास्त्र विभाग**

प्रा.डॉ.गुट्टे पी.व्ही.
M.A. M.Phill, SET,Ph.D. **(संशोधन मार्गदर्शक)**

*** इतिहास विभाग**

प्रा.डॉ.जगतकर व्ही.जी.
M.A. SET, Ph.D. **(संशोधन मार्गदर्शक)**

*** अर्थशास्त्र विभाग**

प्रा.डॉ.जोशी आर.एल.
M.A.B.Ed.,SET,Ph.D. **(संशोधन मार्गदर्शक)**

*** गृहशास्त्र विभाग**

प्रा.डॉ.पाध्ये आर.आर.
M.A. Ph.D. **(संशोधन मार्गदर्शक)**

*** लोकप्रशासन विभाग**

प्रा.श्रीकृष्ण राठोड M.A., SET

*** भूगोल विभाग**

*** संस्कृत विभाग**

प्रा.डॉ.चव्हाण ए.एम. M.A. NET,Ph.D
**(संशोधन मार्गदर्शक)**

*** संगीत विभाग**

प्रा.खोडके एस.ए.(एम.ए.संगीत अलंकार)

*** शारीरिक शिक्षण निदेशक**

प्रा.डॉ.दिग्रसकर पी.पी.
M.P. Ed.SET, Ph.D.**(संशोधन मार्गदर्शक)**

*** ग्रंथपाल**

प्रा.कोकाट एस.आर.
M.Com.,M.Lib.&I.S.C.,DCA.SET

## विज्ञान शाखा

*** गणित विभाग**

प्रा.डॉ.देशपांडे व्ही.व्ही.
M.Sc. Ph.D.**(संशोधन मार्गदर्शक)**

*** पदार्थ विज्ञान विभाग**

प्रा.डॉ.कवडे व्ही.बी.
M.Sc. Ph.D. **(संशोधन मार्गदर्शक)**

*** रसायनशास्त्र विभाग**

प्रा.डॉ.देशपांडे व्ही.जी.
M.Sc.M.Phill, Ph.D. **(संशोधन मार्गदर्शक)**
प्रा.डॉ.जावळे एस.एन. M.Sc. B.Ed.,Ph.D.

**✻ प्राणीशास्त्र विभाग**

प्रा.डॉ.गुळभिले व्ही.डी. M.Sc.B.Ed.Ph.D.(संशोधन मार्गदर्शक)

प्रा.शरद रोडे M.Sc.SET

**✻ संगणकशास्त्र**

प्रा.डॉ.कुलकर्णी जी.ई. M.Sc.,Ph.D.

**✻ वनस्पतीशास्त्र विभाग**

प्रा.डॉ.कचरे एस.व्ही. M.Sc. B.Ed.Ph.D. (संशोधन मार्गदर्शक)

प्रा.डॉ.मुंडे व्ही.आर. M.Sc.Ph.D.

---

### -० कनिष्ठ विभाग ०-

## कला शाखा

प्रा.नव्हाडे पी.पी. M.A. B.Ed.

प्रा.फुटके पी.एम. M.A. B.Ed.

प्रा.देशमुख पी.ए. M.A.B.Ed.

प्रा.आचार्य व्ही.डी.M.A.B.Ed.

## विज्ञान शाखा

प्रा.पवार अशोक रामराव M.Sc. B.Ed.

प्रा.शिंदे अशिलता मुरलीधर M.Sc. B.Ed.

प्रा.पौळ विशाल राजाभाऊ M.Sc. B.Ed.

प्रा.डॉ.भांगे वीणा गोविंदराव M.A.,B.Ed.SET,Ph.D.

## शिक्षकेतर कर्मचारी वृंद

| नाव | पद |
|---|---|
| श्री.कण्व एस.व्ही. | अधीक्षक |
| श्री.पत्की ए.बी. | मुख्य लिपिक |
| श्रीमती गायकवाड एस.डी. | वरिष्ठ लिपिक |
| श्रीमती पत्की सी.पी. | कनिष्ठ लिपिक |
| श्री.सराफ आर.डी. | प्र.सहाय्यक |
| श्री.फुलारी एन.जी. | प्र.सहाय्यक |
| श्री.देशपांडे व्ही.व्ही. | ग्रं.परिचर |
| श्री.देशमुख आर.बी. | प्र.परिचर |
| श्री.किटाळे पी.जे. | प्र.परिचर |
| श्री.वाघमारे जी.एन. | प्र.परिचर |
| श्री.देमगुंडे एम.जी. | प्र.परिचर |
| श्रीमती देशमुख के.ए. | प्र.परिचर |
| श्री.कट्टे ए.जी. | प्र.परिचर |
| श्रीमती दुधाट हे.गो. | सेविका |
| श्री.आचार्य व्ही.एम. | सेवक |
| श्री.दीपक सातपुते | सेवक |

# कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ,जि.बीड.

विद्यापीठाच्या नियमानुसार असलेली फीस खालीलप्रमाणे आहे.

## Fees Structure- 2024-2025

| Sr.No. | Particulars | B.A.I/B.Com-I | | | B.A.II.& III B.Com II,III | | | B.Sc.I | | | B.Sc.II & III | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | F.P. | EBC | GOI | F.P. | EBC | GOI | F.P. | EBC | GOI | F.P. | EBC | GOI |
| 1 | Entrance Fees/Entry Fees | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 |
| 2 | Laboratory Fees | 300 | 300 | 0 | 300 | 300 | 0 | 3000 | 3000 | 0 | 3000 | 3000 | 0 |
| 3 | Library Fees | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 |
| 4 | Gymkhana Fees | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 |
| 5 | Extra Curriculum/Activity Fees/NSS,A,AA,I,vkale,D.M | 56 | 56 | 0 | 56 | 56 | 0 | 56 | 56 | 0 | 56 | 56 | 0 |
| 6 | College Magazine Fees | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 |
| 7 | Computer Training Fees (E - Suvida ) | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 | 50 | 50 | 0 |
| 8 | Regustration Charges Fees | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 9 | University Developmnet Fund | 110 | 110 | 0 | 110 | 110 | 0 | 110 | 110 | 0 | 110 | 110 | 0 |
| 10 | University Sports Fund | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 |
| 11 | University Ashwamedh Fund | 4 | 4 | 0 | 4 | 4 | 0 | 4 | 4 | 0 | 4 | 4 | 0 |
| 12 | University Medical Aid Fund | 15 | 15 | 0 | 15 | 15 | 0 | 15 | 15 | 0 | 15 | 15 | 0 |
| 13 | University Student Assistance/Welfare Fund | 20 | 20 | 0 | 20 | 20 | 0 | 20 | 20 | 0 | 20 | 20 | 0 |
| 15 | University Student Insurance Fund | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 |
| 16 | Youth Festival Chrges | 100 | 100 | 0 | 100 | 100 | 0 | 100 | 100 | 0 | 100 | 100 | 0 |
| 17 | Student ID Charges | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 0 |
| 18 | Project Fees | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 19 | Semester Fees (College Eaxam ) | 75 | 75 | 0 | 75 | 75 | 0 | 75 | 75 | 0 | 75 | 75 | 0 |
| 20 | Session Fees ( Computer Fees ) | 100 | 100 | 0 | 0 | 0 | 0 | 100 | 100 | 0 | 0 | 0 | 0 |
| 21 | **Study Tour / Enviromental Fees** | 0 | 0 | 0 | 100 | 100 | 0 | 0 | 0 | 0 | 100 | 100 | 0 |
| 22 | Eligibility Fees | 50 | 50 | 0 | 0 | 0 | 0 | 50 | 50 | 0 | 0 | 0 | 0 |
| 23 | Tution Fees | 800 | 0 | 0 | 800 | 0 | 0 | 800 | 0 | 0 | 800 | 0 | 0 |
| 24 | Software Fees | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **Total** | | **1935** | **1135** | **25** | **1885** | **1085** | **25** | **4635** | **3835** | **25** | **4585** | **3785** | **25** |
| | | **Non.G/ 2835** | | | **1785** | **985** | | | | | **4485** | **3685** | |

**Eligibility Form : 10 Rs.**

**विद्यार्थिनींकरिता विशेष सूचनाः-** १. सर्वांसाठी आधार क्रमांक अनिवार्य आहे. आधार कार्डाशिवाय शिष्यवृत्ती, ई.बी.सी.अथवा कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही.

२. बी.ए.,बी.एस्सी.,बी.कॉम. प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींनी दहावी उत्तीर्ण असलेल्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे बंधनकारक आहे.

३. शै.वर्ष २०१९-२० पासून सर्व विद्यार्थिनींनी सॉफ्टवेअर फी प्रवेश फी सोबत भरणे आवश्यक आहे. ४. सुरूवातीला दिलेला मो.नंबर बदलता येणार नाही.

Prospects Rs.50 (Pra Fess 300)
Eligibility Form : 10 Rs.